**ठळक बातम्या**

- विकसित आणि सुरक्षित भारताचं स्वप्न साकार करण्यासाठी युवा पिढीला अंमली पदार्थांच्या विळख्यापासून वाचवणं अतिशय गरजेचं असल्याचं केंद्रीय गृहमंत्र्यांचं प्रतिपादन

- प्राप्तिकर विवरणपत्र भरण्यासाठी एक दिवस मुदतवाढ

- मॉरिशसचे प्रधानमंत्री डॉ. रामगुलाम आज राष्ट्रपतींची भेट घेणार

- फिडे ग्रँड स्विस बुद्धिबळ स्पर्धेत भारताची वैशाली रमेशबाबू सलग दुसऱ्यांदा अजिंक्य

**आणि**

- हिमाचल प्रदेश आणि उत्तराखंडमधे पावसामुळे जनजीवन विस्कळीत

**<><><><>**

२०४७ पर्यंत विकसित आणि सुरक्षित भारताचं स्वप्न साकार करण्यासाठी आपल्या युवा पिढीला अंमली पदार्थांच्या विळख्यापासून वाचवणं अतिशय गरजेचं आहे, असं प्रतिपादन गृहमंत्री अमित शहा यांनी आज केलं. राज्यं आणि केंद्रशासित प्रदेशांच्या अंमली पदार्थविरोधी कृतिदल प्रमुखांच्या दुसऱ्या राष्ट्रीय परिषदेत ते आज नवी दिल्ली इथं बोलत होते. अंमली पदार्थांविरोधात व्यापक मोहीम उघडण्याचं आवाहन त्यांनी केलं. फक्त अंमली पदार्थविरोधी ब्युरो आणि गृहमंत्रालय नाही, तर याच्याशी संबंधित केंद्र आणि राज्य सरकारचे सगळे विभाग, तसंच अंमली पदार्थविरोधी कृतिदलांनी यासाठी काम करावं, असं आवाहन त्यांनी केलं. अंमली पदार्थांविरोधातली कारवाई आणि जनजागृतीची दिशा बदलण्याची गरज शहा यांनी अधोरेखित केली. देशाच्या सीमारेषांवर अंमली पदार्थ पोहोचवणारे, सीमारेषांवरून विविध राज्यांपर्यंत नेणारे आणि तिथून पानाच्या दुकानांवर किंवा तत्सम ठिकाणांपर्यंत पोहोचवणारे अशा तीन प्रकारच्या टोळ्यांवर कठोर कारवाई करायची वेळ आली असून त्यासाठी काम करणाऱ्या सगळ्यांनी ही लढाई आपली मानावी, असं ते म्हणाले. या दिशेने सुरू असलेली विविध कामं, मोहिमा आणि कारवायांची माहितीही शहा यांनी दिली. सध्या देशभरात ३७२ जिल्हे, १० कोटी नागरिक आणि ३ लाख

शिक्षणसंस्था अंमली पदार्थविरोधी अभियानासोबत काम करत आहेत, मात्र हे पुरेसं नाही, सर्व जिल्हे आणि शैक्षणिक संस्थांपर्यंत ते पोहोचायला हवं, असं मत शहा यांनी मांडलं.

**<><><><>**

वस्तू आणि सेवा कर परिषदेने नुकत्याच जीएसटी कररचनेत सुधारणा केल्या. यात नवीन आणि नवीकरणीय उर्जा क्षेत्राच्या वाढीसाठी या क्षेत्राशी संबंधित विविध सामग्रीवरच्या करात कपात करण्यात आली आहे. याबाबत अधिक माहिती आमच्या प्रतिनिधीकडून …

**होल्ड… व्हॉईस कास्ट…**

*(केंद्र सरकारच्या स्वच्छ उर्जा उत्पादन धोरणाला आणखी मजबूत करण्यासाठी आणि अपारंपरिक उर्जास्त्रोतांच्या वापराला चालना देण्याच्या उद्देशाने वस्तू आणि सेवा कर परिषदेने जीएसटी दरात कपात केली आहे. यात सौर कुकर, बायोगॅस प्रकल्प, सौर उर्जा निर्मितीसाठीची उपकरणं, सौर विद्युत जनित्र, सौरपंप, पवनचक्की आणि पवनउर्जेवर चालणारी जनित्र, सौर दिवे, जलविद्युत निर्मिती उपकरणं आणि प्रकल्प यांवरचा जीएसटी १२ टक्क्यांवरून ५ टक्के इतका आणण्यात आला आहे. यामुळे या उपकरणांवरच्या खर्चात कपात होऊन पारंपरिक वीजनिर्मितीवरचा ताण कमी होईल, तसंच वीजदरही घटतील. सौरपंपामुळे शेतीच्या सिंचनावरच्या खर्चातही घट होणार आहे. )*

**<><><><>**

सेवा आणि सुशासन या तत्वांचं अनुसरण करीत प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली केंद्रसरकारने अनेक लोकोपयोगी योजना राबवल्या आहेत, हवामान बदल आणि पर्यावरण रक्षणासाठी आंतरराष्ट्रीय स्तरावर केलेल्या कामगिरीचा थोडक्यात आढावा आपण घेणार आहोत….

*(जागतिक स्तरावर भारताने नेहमीच पर्यावरण रक्षणाची भूमिका घेतली आहे. गेल्या ११ वर्षांत वनसंवर्धन, हवामानविषयक न्याय्य भूमिका, सौर आणि हरित ऊर्जा या विषयांचा पुरस्कार करत शाश्वत विकासाला भारताने पाठिंबा दिला आहे. पॅरिसमधे झालेल्या कॉप ट्वेंटीवन परिषदेत 2030 पर्यंत स्वच्छ उर्जा वापर ४० टक्के करण्याचं वचन भारताने दिलं आणि ते 2021मधेच पूर्ण केलं. गेल्या वर्षी अमेरिकेत प्रधानमंत्र्यांनी कार्बन उत्सर्जनाविषयी सांगितलं.)*

**होल्ड- बाईट प्रधानमंत्री**

<><><><>

स्वच्छताही सेवा या अभियानाला उद्यापासून सुरुवात होणार आहे. हे अभियान यंदा स्वच्छतोत्सव म्हणून साजरं होणार असल्याची माहिती गृहनिर्माण आणि नगरविकास मंत्री मनोहर लाल यांनी नवी दिल्ली इथं वार्ताहर परिषदेत दिली. या अभियानादरम्यान देशभर मोठ्या प्रमाणावर स्वच्छता मोहिमा आणि श्रमदान होणार असल्याचं त्यांनी सांगितलं. २५ सप्टेंबर रोजी पंडित दीनदयाळ उपाध्याय यांच्या जयंतीदिनी देशव्यापी एक दिवस, एक साथ, एक तास श्रमदान कार्यक्रम राबवणार असल्याचंही त्यांनी नमूद केलं.

<><><><>

केंद्रीय प्रत्यक्ष कर मंडळानं २०२५-२६ या वर्षासाठी प्राप्तिकर विवरणपत्र भरण्याची मुदत आज एका दिवसानं वाढवली आहे. त्यामुळे आज मध्यरात्रीपर्यंत प्राप्तिकरविवरण पत्र भरता येतील. यंदाच्या करनिर्धारण वर्षासाठी आतापर्यंत सात कोटीहून अधिक प्राप्तिकर विवरणपत्र दाखल झाल्याचं कर विभागानं सांगितलं आहे.

<><><><>

इस्रो आणि नासा यांच्यातली अंतराळ क्षेत्रातली भागीदारी प्रदीर्घ आणि फलदायी असून भारत-अमेरिका सहकार्यातला हा एक महत्त्वपूर्ण स्तंभ आहे, असं प्रतिपादन भारताचे अमेरिकेतले राजदूत विनय मोहन क्वात्रा यांनी केलं. वॉशिंग्टन इथं भारत-अमेरिका अंतराळ सहकार्य कार्यक्रमात ते बोलत होते. चंद्रयान मोहीम, आर्तेमिस अकॉर्ड्स, निसारचं प्रक्षेपण अशा विविध मोहिमा आणि कार्यक्रमांमधून हे सहकार्य वाढत गेलं आहे, असं त्यांनी सांगितलं. भारत लवकरच मानवसहित चंद्र मोहीम आणि स्वतःचं अंतराळ स्थानक उभारण्याची आखणी करत असून नासा यात महत्त्वाचा भागीदार राहील, अशी ग्वाही क्वात्रा यांनी दिली.

<><><><>

मॉरिशसचे प्रधानमंत्री डॉ. नवीनचंद्र रामगुलाम आज नवी दिल्ली इथं राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांची भेट घेणार आहेत. उपराष्ट्रपती सी पी राधाकृष्णन यांना भेटून त्यांनी चर्चा केली. आठ दिवसांच्या भारत दौऱ्यावर आलेले रामगुलाम तिरुपती भेटीनंतर नवी दिल्लीत पोहोचले आहेत. आज सकाळी त्यांनी राजघाटावर जाऊन राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या समाधीचं दर्शन घेतलं. नंतर त्यांनी माजी प्रधानमंत्री दिवंगत अटलबिहारी वाजपेयी यांच्या

सदैव अटल या समाधीवरही पुष्पचक्र वाहून अभिवादन केलं. मॉरिशसच्या प्रधानमंत्र्याच्या भारत दौऱ्याचा आज शेवटचा दिवस आहे. या दौऱ्याला मुंबईतून सुरुवात करुन त्यांनी तिरुपती, वाराणसी, अयोध्या आणि डेहराडूनला भेट दिली.

<><><>

काँगोमधे पुन्हा एकदा ई बोला या आजाराचा प्रादुर्भाव झाला आहे. झैरे ई बोला विषाणूपासून होणाऱ्या या आजाराचे ८१ रुग्ण तिथे आढळले असून २८ रुग्णांचा मृत्यू झाल्याचं सरकारी सूत्रांनी सांगितलं. यापूर्वी २०१९ आणि २०२२ मधे या आजाराची साथ येऊन गेली, मात्र आताचा संसर्ग त्यापेक्षा वेगळा असल्याचं तपासणीत आढळलं आहे.

<><><>

भारताची बुद्धीबळपटू वैशाली रमेशबाबू हिने फिडे ग्रँड स्विस स्पर्धेचं विजेतेपद पटकावलं आहे. तिने अंतिम फेरीत माजी विश्वविजेती चीनची टॅन झोंगई हिच्यावर मात केली. वैशालीचं या स्पर्धेतलं हे सलग दुसरं विजेतेपद असून, अशी कामगिरी करणारी ती पहिली बुद्धीबळपटू आहे.

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी, केंद्रीय गृह मंत्री अमित शाह तसंच संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांनी वैशाली रमेशबाबू चं अभिनंदन केलं आहे.

<><><>

आशिया चषक क्रिकेट स्पर्धेत ब गटातल्या सामन्यात काल श्रीलंकेनं हाँगकाँगच्या संघावर चार गडी राखून विजय मिळवला. हाँगकाँगच्या संघानं निर्धारित 20 षटकांत 4 गडी बाद 149 धावा केल्या. त्याला प्रत्युत्तर देताना श्रीलंकेच्या संघानं 19 षटकांत 6 गडी बाद 156 धावा केल्या. तर अबुधाबी इथं संयुक्त अरब अमिराती संघानं आणि ओमानचा 42 धावांनी पराभव केला. या स्पर्धेत आज बांगलादेश विरुद्ध अफगाणिस्तान सामना आज होणार आहे.

<><><>

हिमाचल प्रदेशात संततधार पावसामुळे जनजीवन विस्कळीत झालं आहे. सिमला इथे काल १४१ मिलीमीटर पावसाची नोंद झाली. अनेक ठिकाणी दरडी कोसळून रस्ते बंद झाले आहेत. हिमलँड, कच्चीघाटी आणि बीसीएल परिसरात १० वाहनांचं नुकसान झालं.

संततधार पावसामुळे राज्यातले नदीनाले दुथडी भरून वाहत आहेत. ३ राष्ट्रीय महामार्ग आणि ६५० रस्ते बंद झाले आहेत. पाणी आणि वीजपुरवठाही खंडित झाला आहे.

उत्तराखंडमध्ये देहरादून इथे सहस्त्रधारा भागात काल रात्री झालेल्या मुसळधार पावसामुळे जनजीवन विस्कळीत झालं आहे. संततधार पावसामुळे शहराच्या अनेक भागात रस्ते आणि पुलांचं नुकसान झालं आहे. मुख्यमंत्री पुष्करसिंह धामी यांनी बाधित जिल्ह्यांची पाहणी करून बचाव आणि मदत कार्याचा आढावा घेतला. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आणि केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी आज पुष्करसिंह धामी यांच्याशी दूरध्वनीवरून उत्तराखंडमधल्या परिस्थितीची सविस्तर माहिती घेतली. या कठीण प्रसंगात उत्तराखंडाला सर्वतोपरी मदत करण्याचं आश्वासन मोदी आणि शहा यांनी दिलं.

हवामान विभागाने हिमाचल प्रदेश आणि उत्तराखंडमधे मुसळधार पावसाचा ऑरेंज अलर्ट जारी केला आहे.

**<><><><>**

ईशान्येकडील राज्यं, बिहार, झारखंडसह मध्य महाराष्ट्र, मराठवाडा, कोकण, विदर्भ, तसंच गोवा आणि पश्चिम बंगालमध्ये काही ठिकाणी मुसळधार ते अतिमुसळधार पावसाचा इशारा हवामान विभागानं दिला आहे. छत्तीसगड, पूर्व उत्तर प्रदेश, हिमाचल प्रदेशसह काही राज्यांमध्येही वादळी वाऱ्यासह पाऊस पडण्याची शक्यता हवामान विभागानं वर्तवली आहे.

**//<><><><>//**